महाराष्ट्र शासन

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,जळगांव

श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर,सिरसोली रोड, जळगाव -४२५००२

ईमेल-gacjalgaon@gmail.com

जा.क्र.शाआमवरुज/भांडार/ग्रंथालय पुस्तके खरेदी/१०७१-७५/२०२१ दिनांक - 13 JUL 2021

## दरपत्रक सुचना

प्रति,

.................................

....................................

विषय :- **ग्रंथालय पुस्तके खरेदीसाठी दरपत्रके सादर करणेबाबत**

या महाविद्यालयास सोबतच्या यादीतील बाबी नमुद तपशिलानुसार खरेदीसाठी विहित वेळापत्रकानुसार संबधित पुरवठादाकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक व पात्र पुरवठादारांनी त्यांची कमीत कमी दरांची दरपत्रके सिलबंद पाकिटामध्ये अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय जळगांव यांचे कार्यालयात पोस्टाने अथवा समक्ष खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

| क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दि १५.०७.२०२१ ते दि २४.०७.२०२१ सुटीचे दिवस वगळुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| 2 | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २७.०७.२०२१ रोजी दुपारी २.०० वा.. |
| 3 | दरपत्रक उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, द्वारा श्री. गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, सिरसोली रोड, जळगांव. ४२५००१. |

**अटी व शर्ती**

१. दिनांक २७-०७-२०२१ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रकाच्या पाकीटावर **ग्रंथालयीन पुस्तके खरेदीसाठीचे दरपत्रक** असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये.

४. पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच दरपत्रके संस्थेची नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सुचनेनुसार विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

५. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील.
**(हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे )**

६. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रकधारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

७. दरपत्रकासोबत GST नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व शॉपॲक्ट परवाना नुतनीकरणासहीत साक्षांकित झेरॉक्स प्रत सादरकरणे आवश्यक राहील.

८. पुस्तक खरेदीवर जास्तीस जास्त सुट देणा-या पुरवठादारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

९. दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

१०. पुरवठा करण्यात येणारी पुस्तके संस्थेस पोहोच करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्यासाठी कोणतेही अतिरक्त शुल्क अदा केले जाणार नाही. तसेच पुरवठा केलेली पुस्तके कोणत्याही प्रकारची नुकसान/गहाळ झालेले असल्यास सदर पुस्तकांचा स्विकार केला जाणार नाही.

११. शा.निर्णन उद्योग व उर्जा विभाग दि.०१.१२.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बाबतीत खरेदीच्या कोणत्याही टप्पावर अनियमितता /गैरप्रकार/नैतिक अध:पतन इतरही बाबीनिदर्शनास आल्यास त्याबाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१२. यशस्वी दरपत्रकधारकास पुरवठाआदेश निर्गमित झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत सदर पुस्तकांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच पुस्ताकांचा पुरवठा केल्यानंतर ३० दिवसाचे आत सदर पुस्तकांमध्ये त्रुटी/ खराब असल्याचे निदर्शनास असल्यास सदर सामुग्री स्वखर्चाने परत नेऊन त्याऐवजी नवीन पुस्ताकांचा पुरवठा ३० दिवसाचे आत करावा लागेल.

१३. यशस्वी दरपत्रक धारकास त्यांचे देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बँक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व रद्द केलेला धनादेश इ. देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

१४. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव हे सदर दरपत्रक स्विकारणे, रद्दकरणे, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी रदद करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

(वैद्य मिलींद भा. निकुंभ)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,
जळगांव.

उपरोक्त दरपत्रकाची सुचना महाविद्यालयाची वेबसाईट **www.gacjalgaon.in** वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१. विहित नमुन्यातील स्वाक्षरीत हमीपत्र
२. आधारकार्ड झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत
३. पॅनकार्ड झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत
४. शॉपअॅक्ट प्रमाणपत्र झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत.
५. **GST** प्रमाणपत्र झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत.
६. व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र छायांकित स्वसाक्षांकित प्रत.
७. संस्थेचा रदद केलेला धनादेशाची झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत

Annexure - B

**कंपनीच्या लेटर हेडवर खालील नमुद तपशिलाप्रमाणे माहिती भरणे.**

**प्रति,**
**अधिष्ठाता,**
**शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,**
**जळगांव.**

| क्र. | तपशिल | आवश्यक माहिती व प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नांव | |
| २ | पुरवठादराचा पत्ता, ई-मेल, दुरध्वनी इ. | |
| ३ | पुरवठादराचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | GST No. | |
| ५ | PAN No. | |
| ६ | सदर वस्तुंचा इतर शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयास पुरवठा केला असल्यास अशा कार्यालयाचे अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत, पत्ता व दुरध्वनी क्रमांक नोंदविण्यात यावा. | |
| ७ | **हमी** प्रत | |
| ८ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ -

दिनांक - पुरवठादाराची अधिकृत स्वाक्षरी शिक्कांसहित

हमीपत्र -१ ( **Undertaking** )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,
जळगांव.

मी ........................................................ (संस्था चालकाचे व संस्थेचे नांव)
पत्ता ...........................................................................................
लेखी हमी देतो की, आपल्या कार्यालयामार्फत ................................खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/ खेरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध/ संघर्ष नाहीत. तसे आढळुन आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ -
दिनांक - पुरवठादाराची अधिकृत स्वाक्षरी शिक्कांसहित

.........................................................................................................

हमीपत्र -२ ( **Undertaking** )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,
जळगांव.

मी ..........................................................................................
पत्ता ...........................................................................................
लेखी हमी देतो की, आपल्या कार्यालयामार्फत ................................खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/ माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक भाग घेणा-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष संबंध वा सहभाग नाही. तसे आढळुन आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ -
दिनांक - पुरवठादाराची अधिकृत स्वाक्षरी शिक्कांसहित